# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/01/2024 (सोमवार) सकाळ

## अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक
## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

दिनांक २९/०१/२०२४ रोजी सकाळी ०८.१० वा. दरम्यान पो.स्टे. भिवापूर हद्दीत स्टाफ पेट्रोलिंग व वाहतूक केसेस करीत असताना गोंडबोरी ते पेंढरी गावाचे डांबरी रोडवर १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-7445 हा येतांना दिसला. त्याचा पाठलाग करून गोंडबोरी गावाजवळ येथे थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर ट्रक क्र. MH-40/BL-7445 किंमती २५,००,०००/—रू व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. असा एकूण २५,३०,०००/— रू.चा मुद्देमाल जप्त करून सदर **टिप्पर चालक/मालक नामे— राकेश रमेश गेडाम, वय ३५ वर्ष, रा. तास भिवापूर** यांचेविरुद्ध कलम ३७९ भा. द. वी. सहकलम ४८(७),४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, नागपूर ग्रा. श्री. डॉ. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पी. एस. आय. सदमेक, पोलीस हवालदार त्रिपाठी, आनंद धात्रक, पोलीस अंमलदार सूरज हिवरकर, चालक पोलीस अंमलदार सोरते यांनी केली.




## फसवणूक

पो.स्टे. बेला :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा बेला येथे दिनांक २७/०१/२०२४ चे १५.२७ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिनव परसरामजी गोळघाटे, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, बेला त. उमरेड जि. नागपूर याच्या मोबाइलवर अज्ञात आरोपी याने क्रेडीट कार्ड ८७६७ रूपयाचा रिवार्ड मिळाला असा बनावटी व खोटा स्वरूपाचा आशयाचा मॅसेज व लिंक पाठवुन फिर्यादीच्या आयसीआयसीआय बॅकेचे क्रेडीट कार्ड खात्यामधुन इलेक्ट्रीक साधनाचा वापर करून एकुण ३३०१३८/– रूपये काढुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवी सहकलम ६६ (क) (ड) मा. त. अधि २००० कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर घटनास्थळी सपोनी अजित कदम पोस्टे बेला यांनी भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतेंद्र रंगारी, मो. नं. ८९७५६०४२८८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर